**संक्षिप्त फौ.प्र.क्र.०९/२०२५**
**निशाणी क्र. ६ लगत**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३**

माझे नाव - प्रकाश गुलाब हांगे,
वय - ५३ वर्षे, व्यवसाय – नोकरी, सहायक पोलीस फौजदार,
नेमुणक - दहिवडी पोलीस ठाणे, दहिवडी.

**सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. वाय. डी. इंगवले यांच्याव्दारे,**

दिनांक ०५/११/२०२४ रोजी मी दहिवडी पोलीस ठाणे येथे सहा. पोलीस फौजदार या पदावर कार्यरत होतो. पोलीस नाईक काळेल यांनी गु.रं.नं.५१०/२०२४ चा तपास माझ्याकडे लेखी आदेशाने दिला. आता तो लेखी आदेश मला दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. सदर आदेशास **निशाणी क्रमांक ११** देण्यात येते. सदर आदेशासोबत गुन्हयातील खबरी जबाब, पंचनामा, वर्दी रिपोर्ट देण्यात आले. दिनांक ०५/११/२०२४ रोजी सदर गुन्हयातील मुद्देमालाचा दोन पंचासमक्ष पंचनामा मी केला. आता मला सदर जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. पंचनाम्यास **निशाणी १२** देण्यात येते. जप्त मुद्देमालाची पावती तयार करून जमा केली. पावतीवर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१३** देण्यात येते.

२. त्यानंतर आरोपीस बीएनएसएस कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिली. आता मला सदरची नोटीस दाखवण्यात आली त्यावर माझी सही व आरोपीचा अंगठा बांधलेला आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात येते. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यानंतर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्याचे विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे फिर्याद दिली. सदर प्रकरणात रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल करण्यात आला आहे. मी आरोपीला ओळखतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. आरोपीला न्यायालयात हजर राहणेसाठी

समज पत्र दिले. सदर समजपत्र आता मला दाखवण्यात आले. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. मी आरोपीला ओळखतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पूर्ण.**
**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. बी. हिरवे यांचे मार्फत सुरु,**

३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५/११/२०२४ रोजी पोलीस नाईक काळेल यांनी गु.रं.नं.५१०/२०२४ चा तपास माझ्या कडे लेखी आदेशाने दिला व त्या आदेशासोबत गुन्हयातील खबरी जबाब, पंचनामा, वर्दी रिपोर्ट दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गुन्हयातील मुद्देमालाचा दोन पंचासमक्ष पंचनामा करून जप्त केला व आरोपीस नोटीस व समजपत्र दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांचे जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरूध्द कोणताही गुन्हा शाबित होत नसताना आरोपीविरूध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द शपथेवर खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास-पुर्ण.**
**फेरतपास-नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
(ए.वाय. शेख)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.

दिनांक २४/०७/२०२५